UNNATI
Institute for
Social & Educational Change

# खबरबात

## एप्रिल ते सप्टेंबर २०२४






www.unnati-isec.org

UNNATI Institute for Social & Educational Change

# ठळक घडामोडी

## उन्नती संस्थेची वार्षिक आढावा सभा यशस्वी वाटचाल आणि भविष्यातील दिशा

उन्नती संस्थेने २०२३-२४ या वर्षातील कार्याचा आढावा घेण्यासाठी 'वार्षिक आढावा सभा' यशस्वीरित्या आयोजित केली. ७ चौकटांच्या मार्गदर्शनाखाली (प्रतिबिंब, बदल, उद्दिष्टे, शिकवण, अडचणी, प्रश्न, पुढील वर्षासाठी सूचना) चर्चा करून कार्यकर्त्यांनी वर्षभराच्या कामाचे विश्लेषण केले तसेच स्वत:चे कौतुक म्हणून शहापूर येथील सख्यांनी उन्नती संस्थेत कार्यरत असताना त्यांच्यात झालेले बदल कवितेच्या ओळींमधून व्यक्त केले.

वर्षभरातील कामगिरीचा सखोल आढावा तीन टप्प्यांमध्ये घेण्यात आला. ज्यामध्ये कार्यकर्त्यांपासून व्यवस्थापक मंडळापर्यंत सर्वांनी सक्रिय सहभाग घेतला.

**पहिला टप्पा** (८ ते १३ एप्रिल)– प्रत्येक प्रकल्पाची स्वतंत्र अंतर्गत आढावा सभा

**दुसरा टप्पा** (१७ ते २० एप्रिल)– प्रत्येक प्रकल्पाने संस्थेच्या व्यवस्थापक मंडळासमोर आढावा सादर केला

**तिसरा टप्पा** (२२ ते २४ एप्रिल)– व्यवस्थापक मंडळासोबत संपूर्ण संघाचा(अकोला, शहापूर) आढावा

सर्व संघांच्या आढाव्यातून निघालेल्या सामायिक मुद्द्यांवर चर्चा विमर्ष व पुढील वाटचालीसाठी निर्णय घेण्यात आले.





# ठळक घडामोडी

## उन्नती संस्थेचे आगामी वर्षाचे नियोजन करण्याची प्रक्रिया

उन्नती संस्थेने २७ ते २९ मे तसेच ३१ मे आणि १ जून या काळात आगामी वर्षाचे संस्थेच्या चारही प्रकल्पांचे MEL (Monitoring, Evaluation, Learning) तयार केले. या कार्यक्रमांच्या उद्दिष्टांचे पुनरावलोकन करून, आवश्यक तिथे भर घालून, बदल करून ती साध्य करण्यासाठी आवश्यक उपक्रम आणि निदर्शक निश्चित करण्यात आले. सर्व संघासमोर याचे सादरीकरण करण्यात आले. यामुळे संघाला कार्यक्रमांचे उद्दिष्ट, उपक्रम आणि परिणाम मोजणीसाठीच्या टप्प्यांची सखोल माहिती मिळाली.

उन्नती संस्था अशा सखोल नियोजनाद्वारे येत्या काळातही शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती साध्य करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

## संचालक मंडळ व वार्षिक सर्वसाधारण सभा



दिनांक १८ जुलै २०२४ रोजी उन्नती संस्थेची संचालक मंडळ सभा व संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २ सप्टेंबर २०२४ रोजी ठाणे येथील संस्थेच्या कार्यालयात पार पडली.

संचालक सभेमध्ये संस्थेच्या कार्यकारी संचालिका हेमांगी जोशी, संचालिका शलाका देशमुख व संचालक मोहन सुर्वे उपस्थित होते. सर्वसाधारण सभेत या तिघांसोबत संस्थेचे सल्लागार शेख जमीर (तेल्हारा), श्रीकृष्ण काकडे(अकोला) व मंदार शिंदे (पुणे) उपस्थित होते. सभेत संस्थेच्या विविध विषयांवर चर्चा करण्यात आली आणि पुढील कार्ययोजना ठरविण्यात आली. सर्वसाधारण सभेत संस्थेचे लेखापाल बोरगावकर यांच्या सहकारी दर्शिता बोरगावकर यांनी आभासी माध्यमाद्वारे संस्थेचा आय व व्यय (income & expenditure) अहवाल सर्वसाधारण सभेसमोर सादर केला व या अहवालास सभेची मंजुरी घेण्यात आली.

## शैक्षणिक वर्षाची यशस्वी सुरुवात
## नियोजन, समन्वय आणि सुसूत्रता

या शैक्षणिक वर्षात सर्व शैक्षणिक उपक्रम वेळेत सुरळीतपणे सुरू झाले आहेत. नियमित वर्गांसह, पालकसभा, गाव वाचनालयाचे संचालन, शिक्षकांसोबतचे नियोजन सादरीकरण आणि सुसंवादाच्या समन्वय सभा यशस्वीरित्या पार पडत आहेत.

प्रत्येक कार्यक्रमासाठी साप्ताहिक सभा घेऊन कामांचे नियोजन केले जात आहे याशिवाय, व्यवस्थापन मंडळाच्या सभा आणि शिक्षकांसोबत नियोजनाच्या सविस्तर चर्चासत्रांमुळे संपूर्ण शैक्षणिक प्रक्रियेत समन्वय साधला गेला आहे.

गाव वाचनालयाच्या उपक्रमाने मुलांच्या वाचनाची गती वाढवली आहे तर, शिक्षक आणि कार्यकर्त्यांच्या सहभागाने विविध उपक्रम सुरळीतपणे सुरू ठेवण्यात आले आहेत. या सर्वांमुळे शैक्षणिक वर्षाची सुरुवात अत्यंत यशस्वी आणि प्रेरणादायी ठरली आहे.



# ठळक घडामोडी

या वर्षी सुरु झालेले काम

| कार्यक्रम | भौगोलिक क्षेत्र | घटक व उपक्रम | उपक्रम स्वरूप |
|---|---|---|---|
| **शिकू आनंदे (साक्षरता विकास)** | अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील आदिवासी क्षेत्र | • इ. १ ते ४ च्या चार शाळा<br>• शिक्षकांसोबत नियोजन सादरीकरण सभा<br>• पालकसभा ३ गावांमध्ये | • आठवड्यातील ५ दिवस अडीच तासांचे नियमित वर्ग<br>• साप्ताहिक सभा प्रत्येक शाळेत<br>• २ महिन्यातून एकदा प्रत्येक गावात |
| **गाव वाचनालय** | अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील आदिवासी क्षेत्र | • ४ आदिवासी गावांमध्ये गाव वाचनालय<br>• भोंगा वाचनालय २ गावांमध्ये | • आठवड्यातून ३ दिवस प्रत्येक गावात<br>• महिन्यातून २ दिवस २ गावात |
| **किशोरींचे नेतृत्व विकसन (LC)** | अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यातील आदिवासी क्षेत्र | • १ आदिवासी गावामध्ये १० ते १९ वयोगटातील १२ मुलींसोबत | • महिन्यातून ३ सत्र |
| **शाळा वाचनालय** | ठाणे जिल्ह्यातील शहापूर तालुक्यातील आदिवासी आश्रमशाळा | • ४ आदिवासी आश्रमशाळांमध्ये इ. ५ ते ७ च्या विद्यार्थ्यांसोबत वाचनालय वर्ग | • प्रत्येक वर्गावर आठवड्यातील ४ दिवस १ ते दीड तासांचे नियमित वर्ग |

## यूथगटाने चालवले गाव वाचनालय

शेणवे आणि बाबरे शाळेत निवासी असणाऱ्या १८ विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांनी आपापल्या १० गावांमध्ये गाव वाचनालय चालवले. या वाचनालयाच्या माध्यमातून हे विद्यार्थी अनुक्रमे १२६ महिला आणि ८१ महिला यांच्यापर्यंत पोहचले.

यामध्ये मुलांनी प्रत्येक गावातील आवश्यकतेनुसार २५ पुस्तकांची निवड केली होती. मुलांनी गावांमध्ये आपले घर असलेल्या वाडीत किंवा गल्लीत गाव वाचनालय चालवले. यामध्ये त्यांनी पुस्तकांचे चटईवरील डिस्प्ले लावून लोकांपर्यंत पुस्तके पोहचवण्याचा प्रयत्न केला. यामध्ये मुलांची संवाद, सर्जनशीलता आदी गोष्टीतील कौशल्ये विकसित होण्यावर भर दिला होता. तसेच या सगळ्यांची नीट नोंदही यावेळी विद्यार्थ्यांनी केली. त्यामुळे यासाठी उन्नतीमधील कार्यकर्त्या सख्यांनी देखील गावांमध्ये भेटी दिल्या.





# वाचन अभ्यासगट उपक्रमाची यशस्वी सुरुवात

दिनांक २७ जुलै २०२४ रोजी, उन्नती संस्थेच्या संचालिका हेमांगी जोशी यांनी संस्थेच्या कार्यकर्त्यांना वाचनाची गोडी लागावी, त्यांना नियमितपणे वाचनाची सवय लागावी यासाठी ‘वाचन अभ्यासगट’ हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. अभ्यासगटाचे स्वरूप, नियम, आणि पुस्तक निवडीबाबत त्यांनी कार्यकर्त्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. त्यामधून प्रत्येक शनिवारी सकाळी ९ ते १० या वेळेत एक तासाचे ‘वाचन सत्र’ ठरवण्यात आले.

अकोला येथे २ गट व शहापूर येथे १ वाचनगट चालतो. निवडलेल्या पुस्तकांचे वाचन करताना अर्थ न समजलेल्या शब्दांची नोंद केली जाते आणि त्यानंतर त्यांचे अर्थ शोधून समजावून घेतले जातात. वाचन पूर्ण झाल्यावर सर्व कार्यकर्ते पुस्तकातील विचारांवर आपापली मते मांडतात, ज्यामुळे ज्ञानाची देवाणघेवाण होते आणि नवनवीन दृष्टिकोनांचा विकास होतो. त्यांची भाषिक कौशल्येही सुधारण्यासाठी मदत होते.

आतापर्यंत अभ्यासगटांची ९ सत्रे पार पडली असून, अकोला संघातील एकूण २२ कार्यकर्त्यांनी यामध्ये सहभाग घेतला आहे तर, शहापूर संघातील ६ कार्यकर्त्यांचा एक गट शहापूर येथे चालतो. या उपक्रमातून कार्यकर्त्यांच्या शब्दसंग्रहात भर पडत आहे आणि त्यांना नवनवीन माहिती मिळत आहे. हे वाचन सत्र केवळ ज्ञान मिळविण्यापुरते मर्यादित न राहता ते कार्यकर्त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासाचे एक सशक्त साधन ठरले आहे.

## संस्थेला विशेष पाहुण्यांची भेट

**१. जपानी मुलांची भेट (२० ते २४ ऑगस्ट २०२४):**

जपान येथील काझुतोशी कामाडा आणि तात्सुकी मियामी या तृतीय वर्षाला शिकत असलेल्या दोन विद्यार्थ्यांनी उन्नती संघाच्या शहापूर व अकोला प्रकल्पाला २० ते २४ ऑगस्ट २०२४ रोजी भेट दिली. भारतातील शिक्षणपद्धती आणि जपानी शिक्षण पद्धतीतील फरक, मुलांचे दिनक्रम, अडचणी इत्यादी समजून घेण्याच्या उद्देशाने या विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला.

तसेच शाळेतील विद्यार्थ्यांनी देखील त्यांना विविध प्रश्न विचारून माहिती घेतली. यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना जपान हा देश नकाशावर कुठे आहे इथपासून ते तिथले चलन, खानपान संस्कृती, शिक्षणपद्धती, संस्कृती, सणवार ते अगदी लग्नसंस्था, पाळीव प्राणी कुठले असतात इथपर्यंत सगळे प्रश्न विचारून आपल्या जिज्ञासेची चुणूक दाखवली. जपानी विद्यार्थ्यांनी गावामध्ये गाव निरीक्षणसुद्धा केले. पोलीस पाटील व गावकरी यांच्याशी गावाबद्दल माहिती जाणून घेतली. जपानी मुलांच्या भेटीने लोकांमध्ये कुतूहल व त्यांना पाहण्याचा उत्साह पाहण्याजोगा होता.



**२. सोनल पारधी यांची भेट (२८ व २९ ऑगस्ट २०२४):**
सोनल पारधी या आदिवासी भाषांवर पीएचडी करत असून त्यांनी संस्थेच्या शिकू आनंदे (मातृभाषा आधारित बहुभाषिक साक्षरता शिक्षण), गाव वाचनालय आणि LC (लर्निंग कम्युनिटी) कार्यक्रमांना भेट दिली. त्यांनी विशेषतः मुलांच्या मातृभाषेचा वापर कसा प्रभावीपणे शाळांमध्ये केला जातो यावर लक्ष केंद्रित केले.

## बागुल सभा आणि १० वा वर्धापन दिन सोहळा संपन्न

दिनांक २६ व २७ ऑगस्ट २०२४ रोजी संस्थेची बागुल सभा (बागुल म्हणजेच रवंथ करणे) व संस्थेचा वर्धापन दिन सोहळा गजानन महाराज विहीर, संस्थान या रमणीय ठिकाणी एकत्र येऊन सर्व संघाने एकत्र येत साजरा केला.
यावेळी संस्थेच्या ब्रीदवाक्यातील प्रत्येक संज्ञा सर्वांनी एकत्र मिळून सर्वंकष चर्चा करीत समजून घेतली. कार्यकर्त्यांबरोबर अशा प्रकारची चर्चा ही संस्थेचा पाया मजबूत करण्यात अधिक परिणामकारक असते अशी संस्थेची धारणा आहे.
याशिवाय, संस्थेच्या वर्धापन दिन सोहळ्याच्या निमित्ताने संस्थेचे जुने कार्यकर्ते आणि संस्थेशी जुळलेले हितचिंतक आल्यामुळे या सभेला रंगत आली. संस्थेचा १० वर्षांचा प्रवास साजरा करताना विविध उपक्रम आणि कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी सर्वांना मिळाली.



# चित्रवाचनाची गल्लीतली गाथा

## गाव वाचनालयाचा बदलता प्रवाह



प्रत्येक घराच्या दाराशी जाऊन पालकांना हाक मारून पुस्तकाची देवघेव सुरू असताना उन्नती संस्थेचे गावमित्र विलास ढिगर यांच्या घरासमोर पोहोचले. हे गाव वाचनालयातील नियमित वाचक होते आणि त्यांना पुस्तके वाचायला खूप आवडत होती. मात्र, त्यादिवशी ते घरी नव्हते. गावमित्रांनी पुढे जायची तयारी केली तेवढ्यात विलास ढिगर यांच्या मुली तेजस्विनी (इ. ७) आणि सुहाना (इ. ३) बाहेर आल्या आणि त्यांनी स्वत:साठी पुस्तके निवडायला सुरुवात केली. मुलींच्या पुस्तक निवडीमध्ये एक खास गोष्ट दिसून आली. त्या दोघी पुस्तकांचे मुखपृष्ठ आणि चित्रे बघून एकमेकींशी चर्चा करत होत्या. त्यांचे निरीक्षण खूप बारकाईने चालले होते. विशेष म्हणजे, त्या मुली कोरकू भाषेत चित्रवाचन करत होत्या. मुलींच्या उत्साहाने गावातील इतर मुलांना आकर्षित केले.

काही वेळातच गल्लीत ५ ते ७ मुले गोळा झाली आणि त्यांनी मुक्तपणे पुस्तक वाचन सुरू केले. ही प्रक्रिया पुढे नियमित होऊ लागली. प्रत्येक मंगळवारी जेव्हा गावमित्र वाचनालय घेऊन येतात तेव्हा त्या गल्लीतली मुलं एकत्र येऊन आनंदाने पुस्तके वाचत असतात.

गाव वाचनालय उपक्रम मुलांसाठी आणि पालकांसाठी वाचन संस्कृती वाढवण्याचा एक प्रभावी उपक्रम ठरतो आहे. या उपक्रमात गावातील मुलांना आणि पालकांना विविध प्रकारची पुस्तके वाचनासाठी दिली जातात. या प्रक्रियेच्या माध्यमातून वाचनाची गोडी निर्माण करणे हा प्रमुख उद्देश असतो. मुलं आणि पालकांना पुस्तक देणे आणि घेणे काही वेळा जिकिरीचं वाटत असलं तरी त्यांचा उत्साह बघून ही प्रक्रिया अधिकच प्रेरणादायी ठरते.

# आमची आव्हाने

## कोहा येथे झालेल्या गावसभेतील घडामोडी




दिनांक ८ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत कोहा गावात गाव वाचनालयासाठी गावमित्र मिळत नसल्यामुळे तेथे गावसभेचे आयोजन करण्यात आले होते. ही सभा दिनांक ८ ऑगस्ट २०२४ रोजी संध्याकाळी ५ ते ६ या वेळेत झाली. सभेत गाव वाचनालयाच्या संदर्भातील अडचणी मांडण्यात आल्या आणि नवीन गावमित्रांची मागणीही करण्यात आली.

गावकऱ्यांनी गावातील ३ लोकांचे नाव सुचवले. ज्यांचे सोबत मुलाखत घेण्यात आली. यामधील २ पुरुष कार्यकर्त्यांनी सदर काम करण्यास नकार दिला व एक महिला कार्यकर्ता यासाठी तयार झाली मात्र तिचे छोटे बाळ व त्यात घरची जबाबदारी असल्यामुळे ती हे काम करण्यास अक्षम ठरली. काही दिवस तिने काम करण्याचे प्रयत्न केले मात्र त्यानंतर काम सोडण्याचा निर्णय घेतला. कार्यकर्ता नसल्यामुळे कोहा या गावातील दोन गल्लीमधील वाचनालय बंद करण्यात आले मात्र एका गल्लीत जनुना येथील कार्यकर्ता नियमित पुस्तक देवघेव प्रक्रिया करीत आहे.

## खरेदी केलेली पुस्तक डिस्प्ले

अकोला कार्यालयाने जून २०२४ या महिन्यात एकूण १६४ नवीन पुस्तके खरेदी केली. या पुस्तकांची नोंद संस्थेच्या कार्यालय लायब्ररी व्यवस्थापनात करण्यात आली तसेच विदा पद्धतीने त्यांची माहिती ठेवली गेली. प्रत्येक पुस्तकाचे व्यवस्थित लेबलिंग करून ती अंतिमतः वापरासाठी तयार करण्यात आली.





कार्यालयमध्ये आलेल्या नवीन पुस्तकांची माहिती सर्व कार्यकर्त्यांना असावी या हेतूने नेहमी आलेल्या नवीन पुस्तकांचा डिस्प्ले कार्यालयात आकर्षक पद्धतीने लावण्यात आला ज्यामध्ये सर्व संघाने सहभाग घेतला. या उपक्रमाद्वारे संस्थेतील प्रत्येक सदस्याला पुस्तकांची ओळख करून देण्यात आली. वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा डिस्प्ले सर्व कार्यकर्त्यांना नव्या माहितीच्या जगात घेऊन जाणारा ठरला.

# क्षेत्र घडामोडी

## साक्षरता चाचणी (शहापूर प्रकल्प )

वाचनालयातील साक्षरता हा देखील उन्नतीच्या कामाचा भाग असल्याने जुलै महिन्यात चारही आश्रमशाळांतील मुलांच्या साक्षरता क्षमतचा चाचणी घेण्यात आल्या. मुलांच्या वाचन क्षमता तपासणे हे यामागील प्रमुख उद्दिष्ट होतं. यासाठी चारही आश्रमशाळांतील मिळून पाचवी- इयत्तेतील ७७ मुली आणि ३२ मुलगे तर सहावी इयत्तेतील ८८ मुली व ५५ मुले सहभागी करून घेण्यात आली होती.

या चाचणीनुसार विद्यार्थ्यांच्या क्षमता खालीलप्रमाणे :

| अनुक्रमणिका | वाचनगट पूर्ण | वाचनगट | जोडाक्षरे गट | चौदाखडी गट | मुळाक्षरे गट | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| पाचवी | 30 | 15 | 24 | 23 | 16 | 108 |
| सहावी | 58 | 17 | 36 | 16 | 15 | 144 |
| एकूण | 88 | 32 | 60 | 39 | 31 | 252 |

यानुसार सर्वाधिक मुलांची संख्या ही आकलनासहीत वाचता येणाऱ्या (वाचनगट पूर्ण), वाचन गट आणि जोडाक्षर गटातील विद्यार्थ्यांची आहे त्यामुळे चौदाखडी आणि मुळाक्षर गटाबरोबर विविध प्रकारचे उन्नती वाचनालय उपक्रमाच्या माध्यमातून वाचन पूर्ण गटापर्यंत आणण्याचे प्रमुख काम असणार आहे तर, वाचन आणि वाचनपूर्ण गटाद्वारे आदिवासी भाषांमधील संवाद, वाक्य विकसित होणे अपेक्षित असणार आहे.

# आमची आव्हाने

## खिरकुंड बु. येथे उन्नती संस्थेच्या वर्गासमोरील अडचणी आणि आव्हाने



मागील वर्षी सुरू केलेला खिरकुंड बु. शाळेतील वर्ग, वर्गखोली उपलब्ध नसल्यामुळे ग्रामपंचायतच्या खोलीत घेतला होता. मात्र, यावर्षी त्या खोलीत ग्रामपंचायतीचे साहित्य ठेवले असल्याने ती खोली उपलब्ध होऊ शकली नाही.

या परिस्थितीत गावातील एका सज्जन व्यक्तीने आपली खोली उपलब्ध करून दिली. तथापि, पावसाळ्याच्या दिवसांत ही खोली गळत असल्याने शिक्षणासाठी सोईस्कर नव्हती. शिवाय, पालकांमध्ये या जागेबाबत काही अंधश्रद्धांमुळे भीती निर्माण झाली होती. शाळेपासून दूर असल्याने काही मुलांनीही तिथे जाण्यास नकार दिला. या सगळ्या गोष्टींचा परिणाम मुलांच्या उपस्थितीवर दिसून आला.

विकल्प म्हणून, उन्नती संस्थेने शाळेच्या पटांगणात वर्ग घेण्याचा निर्णय घेतला परंतु, खुल्या जागेत शिकवताना मुलांचे लक्ष विविध गोष्टींमुळे विचलित होत होते. त्यामुळे मुलांच्या शिकण्याच्या प्रक्रियेवरही विपरीत परिणाम झाला.

या समस्येचे निराकरण करण्यासाठी संस्थेने शिक्षकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला परंतु, त्यांच्याकडूनसुद्धा काही उपाय होऊ शकला नाही. त्यामुळे एका वर्गाचे काम नाईलाजास्तव थांबवण्याचा निर्णय घ्यावा लागला. शिक्षणाच्या प्रवासातील या अडचणींवर पुढील काळात सर्वांनी मिळून उपाय शोधणे आवश्यक आहे, ज्यामुळे मुलांचे शिक्षण अविरतपणे सुरू राहू शकेल.

अकोला जिल्ह्यातील अकोट तालुक्यात वसलेले खिरकुंड बु. हे आदिवासी बहुल गाव असून येथे उन्नती संस्था मागील तीन वर्षांपासून शिक्षणाच्या क्षेत्रात काम करत आहे. गावातील जिल्हा परिषद शाळेत इयत्ता तिसरीच्या विद्यार्थ्यांसाठी संस्थेचे दोन वर्ग चालवले जात होते; त्यापैकी एक वर्ग जुना आहे आणि दुसरा वर्ग मागील वर्षी सुरू करण्यात आला होता.

UNNATI Institute for Social & Educational Change

# संघ सक्षमीकरण

## प्रशिक्षणे

**कार्यकर्त्यांचे एप्रिल-सप्टेंबर २०२४ मधील प्रशिक्षण सत्र: कौशल्यवृद्धी आणि भविष्यासाठी तयारी.**

शाळांना सुट्टी असताना उन्नती संस्थेच्या कार्यकर्त्यांनी प्रशिक्षण आणि पुढील वर्षाचे नियोजन करण्यास प्राधान्य दिले होते. यंदा एप्रिल ते सप्टे. २०२४ या कालावधीत २५ प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करण्यात आले; ज्यामध्ये अकोला आणि शहापूर संघातील एकूण १९ सदस्यांनी सहभाग घेतला.

त्यातील ९ प्रशिक्षणे बाह्य संस्था/व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली झालीत. यामध्ये संस्थेच्या ६ सदस्यांनी सहभाग घेतला.

१. **LC - मेंटर अँड पिअर मेंटर प्रशिक्षण** (वाचा, भाइंदर, मुंबई),
२. **स्वभान ते समाजभान** (युवा छावणी शिबीर, वडघर, माणगाव)
३. **मेंटोर प्रशिक्षण** (वाचा, अंधेरी, मुंबई), ४. **पुस्तक मैत्री अभ्यासक्रम भाग १** (प्रगत शिक्षण संस्था, पुणे),५. **लायब्ररी से दोस्ती** (एकलव्य, भोपाळ), ६. **पुस्तक मैत्री अभ्यासक्रम भाग २** (प्रगत शिक्षण संस्था, पुणे), ७. **LC -Mentor check in** (वाचा, अंधेरी, मुंबई), ८. **प्रकाशक बना** (विश्व मराठी परिषद,आभासी ), ९. **लीडरशिप वर मुलींची कार्यशाळा** (वाचा, अंधेरी, मुंबई).



गाणे प्रशिक्षण



गोष्ट लेखन कार्यशाळा
बडी सिस्टीम ने काम करताना

# संघ सक्षमीकरण

**याशिवाय संस्थेअंतर्गत झालेली प्रशिक्षणे अशी :**

१०. गोष्ट लेखन कार्यशाळा ११. वर्ग कसा असावा १२. शब्दकोशाचा वापर १३. नियोजन कसे करावे १४. मुलांशी संवाद कसा करावा १५ . शिक्षण हक्क कायदा १६. गाणे भाग- १ १७ . DARCII (शहापूर येथील कुटघर येथे) १८ . अक्षर परिचय १९. गोष्ट कशी सांगावी २०. कला २१.वर्ग उद्दिष्टे २२ . शैक्षणिक साहित्याचा दृढीकरणासाठी वापर २३ .चाचणी २४.गाणे भाग -२ २५. बागुल सभा / मन:स्वास्थ्य

ही प्रशिक्षणे शहापूर, अकोला या ठिकाणी पार पडली. उन्नती संस्थेच्या या प्रशिक्षण सत्रांमुळे कार्यकर्त्यांच्या कौशल्यांचा विकास झाला आहे आणि पुढील वर्षासाठी ठोस नियोजन करण्यात मदत झाली आहे.



कला प्रशिक्षण



गाणे प्रशिक्षण

# संघ सक्षमीकरण

**कार्यकर्त्यांनी घेतले शिक्षणहक्क कायद्याचे प्रशिक्षण:**

पुणे येथील शिक्षण हक्क चळवळीतील प्रमुख कार्यकर्ते व अभ्यासक मंदार शिंदे हे प्रशिक्षण घेतले. कायदा म्हणजे काय? कायदा कोण बनवते, योजना, कायदा,अभियान यातील फरक कोणते आदीबाबत विस्तृत माहिती त्यांच्याद्वारे देण्यात आली.

त्यानंतर बालक म्हणजे कोण, बालकांचे विविध कायदे कोणते आणि त्यामध्ये बालकांचे निश्चित केलेले वय, त्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी इत्यादी मांडणी करण्यात आली. 1) बाल शिक्षण हक्क कायदा, 2) बाल कामगार विरोधी कायदा 3) बाल लैंगिक शोषण विरोधी कायदा, 4) बाल गुन्हा कायदा, 5) बाल विवाह विरोधी कायदा इत्यादी कायद्यांवर साधक-बाधक चर्चा झाली.

शिक्षण हक्क कायदा लागू करण्याचे प्रयोजन व त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या दुरुस्त्या याविषयी सहभागींना माहिती देण्यात आली. त्यानंतर विविध कार्यकर्ते मांडत असलेल्या प्रश्नाचे निराकरण हे शिक्षण हक्क कायद्यामध्येच कसे आहे याचे विविध कलमे वाचून समजवण्यात आले. त्यामुळे कायदादेखील मनोरंजक वाटू लागला. एकूणच हे सत्र अत्यंत रोचक आणि व्यावहारिक मुद्द्यांना धरून घेण्यात आले. या सत्रासाठी शहापूर आणि अकोला संघातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

**मानसिक आरोग्य या विषयातील बैठक:**

मुलांचे मानसिक आरोग्य समजावून घेऊन त्यावर सहभागी पद्धतीने अभ्यासक्रम तयार करण्यात येणार आहे. यासाठी 'सेंटर फॉर मेंटल हेल्थ लॉ आणि पॉलिसी' या संस्थेच्या वतीने नीरजा अवटी यांची एक बैठक टीमबरोबर आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नीरजा यांनी संस्थेचे रचना आणि संस्थेचे काम समजावून घेतले. मुलांबाबतचा अप्रोच, संघाचा मुलांशी असलेला कनेक्ट इत्यादी बाबतही प्रश्न विचारले. यासाठी रुपाली पेठकर, गौरी गोखले, गायत्री लोणकर, रविंद्र कवाडे आणि प्रमिला आदी स्टाफ ऑनलाईन पद्धतीने कनेक्ट झाले होते.

# समन्वय भेटी



**अहवाल सादरीकरण :**

**अकोला प्रकल्प-** शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उपक्रमांची संपूर्ण माहिती असलेला कामाचा अहवाल तयार करून तो १६ एप्रिल २०२४ रोजी अकोट तालुका शिक्षण विभागाला सादर करण्यात आला.

**शहापूर प्रकल्प-** अकोल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील उपक्रमांचा संपूर्ण माहिती असलेला अहवाल तयार करून तो जून महिन्यात सादर करण्यात आला. नव्यानच पदभार स्वीकारलेले प्रकल्प अधिकारी श्री हिवाळे यांनी या अहवालाबाबत चर्चा केली. अहवालामध्ये वर्षभर शाळेत राबवण्यात आलेला वाचनालय प्रकल्प, पुस्तकांची देवघेव त्यातील लाभार्थींची संख्या आणि प्रगती आदी माहिती देण्यात आली. तसेच पुढील वर्षातील प्रकल्पास मान्यता दिली.

**मुख्याध्यापक सभा:**

**अकोला प्रकल्प-** मुख्याध्यापकांची सभा केंद्रप्रमुखांच्या नेतृत्वाखाली २० जुलै २०२४ रोजी झाली. शिक्षण विभागाने रुईखेड केंद्रांतील शाळांसाठी आयोजित केलेल्या या सभेत संस्थेचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. आगामी वर्षात शिक्षक अभ्यासगटांचे स्वरूप ठरविण्यावर चर्चा झाली. यंदा अभ्यासगट शनिवारच्या शाळेच्या वेळेत आयोजित करावेत, अभ्यासगटाच्या दिवशी शिक्षक शाळेत न जाता अभ्यासगटांमध्ये सहभागी होतील असे ठरले. या सभेमुळे शिक्षक अभ्यासगटांचे नियोजन अधिक सुसूत्र आणि प्रभावी करण्यासाठी महत्त्वाची दिशा मिळाली.

**शहापूर प्रकल्प-** काम करत असलेल्या शाळांच्या मुख्याध्यापक/ शिक्षकांच्या २ सभा; दिनांक १२ एप्रिल व १२ जुलै २०२४ रोजी शेणवे येथील कार्यालयात पार पडल्या. वर्षभरात झालेल्या कामाची व येत्या वर्षीच्या उपक्रमांचे स्वरूप यावर सविस्तर मांडणी झाली. शिक्षकांनीही उन्नती संस्थेच्या कामाची प्रशंसा केली तसेच, मुलांमध्ये झालेले सकारात्मक बदलांचाही स्वीकार केला.

UNNATI
Institute for Social & Educational Change








# YOUR SUPPORT WILL HELP US GROW!

**OUR BANKER:**
PUNJAB NATIONAL BANK, M. G. ROAD, THANE (WEST) MAH. 400602

**ACCOUNT NAME:** UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE

**SAVINGS AC NO.:**
3739 0001 0064 2890

**IFSC :** PUNB0373900

QR CODE FOR DONATIONS


पत्ता- उन्नती संस्था, ४०२, निसर्ग कृपा,
सुयोग मंगल कार्यालयाजवळ,
टिळक नगर, डोंबिवली पूर्व, ४२१२०१

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

9892103371

https://www.facebook.com/UNNATIFOREDUCATION?mibextid=ZbWKwL

unnati.isec@gmail.com